महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
**सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय उप आयुक्त कार्यालय, अकोला.**
एस.पी. बंगल्याजवळ , मुर्तीजापुर रोड अकोला.
फोन नंबर-०७२४-२४१४८४२. ई- मेल-supdtest.ak-mh@gov.in

जाक/आस्था/कंत्राटी पद भरती / 2840 /२०२६ दि. 13 / 10 /२०२६

**जाहीर प्रसिध्दीकरण**
**निविदा/दरपत्रक ०१/२०२६**

या व्दारे संबंधितांना सुचित करण्यात येते की,धर्मादाय उप आयुक्त,अकोला या कार्यालयात शिपाई , पहारेकरी या पदाचे कामकाज करण्याकरीता ,बाहय यंत्रणे मार्फत मान्यता प्राप्त संस्था/कंपनी/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडून उमेदवारांची सेवा कंत्राटी तत्वावर उपलब्ध करून घेण्यास प्रस्ताव मान्यते करीता मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सादर करण्याचे सुचित केले आहे.

सबब मान्यताप्राप्त संस्था/कंपनी/कंत्राटदार/ठेकेदार यांचे कडून कंत्राटी तत्वावर शिपाई व पहारेकरी या पदाकरीता तात्पुरत्या कंत्राटी स्वरूपात ११ महीन्याच्या कालावधी करीता सेवा उपलब्ध करून देण्याचे कामी निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.तसेच सदर निविदा कार्यक्रम खालील प्रमाणे राबविण्यात येत आहे.

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | जाहीर नोटीस प्रसिध्द करणे | १३/१०/२०२६ |
| २ | http;//charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर निविदा प्रसिध्द करणे | १४/१०/२०२६ |
| ३ | निविदा स्विकारण्याबाबत अंतिम तारीख | २७/१०/२०२६ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ४ | निवड समिती समोर निविदा उघडण्याची तारीख | २८/१०/२०२६ |
| ५ | निवड समिती समोर निविदा उघडल्यानंतर आदेशानंतर तुलनात्मक तक्ता तयार करणे व एल १ ची निवड करणे | २९/१०/२०२६ |

टिप :संबधित निविदा धारकाने अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींनी दि. २८/१०/२०२६ रोजी ३.०० वाजता धर्मादाय उप आयुक्त कार्यालय,अकोला येथे उपस्थित रहावे.

(प्रदिप म चौधरी)
धर्मादाय उप आयुक्त,अकोला

प्रत,
मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुबई
कार्यालयीन नोटीस बोर्ड
कार्यालयीन आदेश धारीणी

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
सार्वजनिक न्यास नोंदणी तथा धर्मादाय उप आयुक्त कार्यालय, अकोला.
एस.पी. बंगल्याजवळ , मुर्तीजापुर रोड अकोला.
फोन नंबर-०७२४-२४१४८४२. ई- मेल-supdtest:ak-mh@gov.in

जाक/आस्था/कंत्राटी पद भरती / २९४१ /२०२६ दि. 12 / 10 /२०२६

## निविदा सुचना

### निविदा/दरपत्रक ०१/२०२६

**बाहययंत्रना मार्फत मनुष्यबळ ( शिपाई व पहारेकरी ) पुरविणाऱ्या मान्यता प्राप्त संस्था/ कंपनी/कंत्राटदार /ठेकेदार यांचे कडून दरपत्रक मागविणेबाबत.**

धर्मदाय उप आयुक्त कार्यालय, अकोला या कार्यालयात शिपाई व पहारेकरी पद शासन मान्यतेच्या दिनांकापासुन अकरा महिन्याच्या कालावधीसाठी बाहययंत्रणे मार्फत भरण्यासाठी शिपाई व पहारेकरी पुरविणाऱ्या मान्यता प्राप्त संस्था/ कंपनी / कंत्राटदार / ठेकेदार यांचे कडून प्रत्यक्षरित्या निविदा दिनांक 27/10/2026 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत वरील नमुद या कार्यालयाच्या पत्त्यावर मागविण्यांत येत आहे. निविदा लिफाफयावर (कंत्राटी) पदाकरीता निविदा तसेच निविदा देणाऱ्याचे नाव नमुद करणे आवश्यक आहे.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल, बाहययंत्रणाव्दारे पुरविणाऱ्या संस्थेकरिता तसेच आवश्यक अटी, शर्ती इ.विषयक तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. | पक्षकार |
|---|---|
| 1 | करारनाम्याचे पक्षकार हे संस्था/ कंपनी /कंत्राटदार / ठेकेदार ( ज्यांना काम सोपविले आहे.) आणि धर्मदाय उप आयुक्त अकोला हे राहतील. |

| ब | शिपाई व पहारेकरी उमेदवारांसाठी अटी व शर्ती |
|---|---|
| 1 | दिनांक 14/10/2026 रोजी उमेदवाराचे वय किमान वय 18 वर्षे व कमाल 45 असावे. |
| 2 | उमेदवारास मराठी,हिंदी, भाषा वाचता व बोलता आणि इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे. |
| 3 | उमेदवार किमान माध्यमिक शालांत परीक्षा (10 वी ) उत्तीर्ण असावा. |
| 4 | उमेदवार निर्व्यसनी असावा , गुन्हेगारी पार्श्वभुमीचा नसावा. |
| 5 | शिपाई व पहारेकरी यांची वैयक्तिक माहिती कंत्राटदारास पुरविणे आवश्यक राहिल, उदा. ओळखपत्र , (आधारकार्ड,निवडणुक कार्ड ,पॅन कार्ड इत्यादी पैकी एक), शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पता , नमुना स्वाक्षरी , अलीकडे काढलेला पासपोर्ट साइज फोटोग्राफ व बँक |

| | |
|---|---|
| | खात्याचा तपशील |

| क | कंत्राटी शिपाई व पहारेकरी यांची जबाबदारी |
|---|---|
| 1 | कंत्राटी शिपाई व पहारेकरी हे संपुर्ण गणवेशात असावे. |
| 2 | कार्यालयात कार्यालयीन वेळ शिपाई सकाळी 9.30 ते 6.30 , पहारेकरी कार्यालयीन वेळ संध्याकाळी वेळ 6.15 ते सकाळी 8.30 वाजेपर्यंत हजर राहावे लागेल. |
| 3 | कार्यालय चालु व बंद करण्यांची जबाबदारी, वरिष्ठांच्या दालनाबाहेर कार्यालयीन वेळेत बसुन राहणे व कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांनी सांगितलेली कामे पार पाडावी लागतील. पहारेकरी यांना कार्यालयाची पहाणी व निगराणी करणे, संध्याकाळी वेळ 6.15 ते सकाळी 8.30 पर्यंत कार्याल्याच्या सुरक्षेची जबाबदारी पहारेकरी यांची राहिल. |
| 4 | वक्तशीरपणे व नियमितपणे कार्यालयातील कामे करावी लागतील. |
| 5 | शिपाई , पहारेकरी यांची वर्तणूक व कामाची गुणवत्ता उच्च दर्जाची राहील व त्यांचे उत्तरदायित्व हे कार्यालयाच्या हितसंबंधाची रक्षा करणेच राहील. |
| 6 | शिपाई , पहारेकरी यांचे कडुन कार्यालयातील सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले असे आढळून आल्यास त्यांना देय असलेल्या रक्मेतून सदर रक्कम वसूल करण्यांत येईल. |
| 7 | न्यायीक प्रकरणांचा पुकारा करणे. |
| 8 | कार्यालयातील वरिष्ठाकडून वेळोवेळी देण्यांत येणाऱ्या आदेशाचे पालन करावे लागेल. |

# निविदा प्रक्रिया

संपूर्ण निविदा प्रक्रीया प्रत्येक्षरित्या निविदा असुन ती तांत्रिक निविदा लखोटा (Techinical Envelope(B- व आर्थिक लखोटा (Financial Bid Envelope(B-2)) अशा दोन लखोटा पध्दतीने राहील. तरी दोन्ही लखोटे स्वतंत्र द्यावे. सदर लखोटयावर तांत्रिक लखोटा / आर्थिक लखोटा अशे नमुद करावे व कंत्राटदाराचा स्टॅम्प /सिल लावावे.

**अ) तांत्रिक निविदा :-**

1) निविदा सादर करण्या करीता अर्ज ( सोबत नमुना)
2) निविदाकाराने शिपाई , पहारेकरी (कंत्राटी) यांची सेवा केंद्र / राज्य शासन व इतर अन्य आस्थापनेवर पुरविली असल्यास त्या बाबतचे संबंधित कार्यालयाने जारी केलेले कार्यालयीन आदेश व कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र ( अनुभवाची अट शिथिल करण्यांचे अधिकार निवड समितीस राहील.)
3) कंपनीचे / संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र
4) व्यवसाय कर (Professional Tax) प्रमाणपत्र
5) ई.पी.एफ (Employees Provident Fund) नोंदणी प्रमाणपत्र
6) E.S.I.C नोंदणी प्रमाणपत्र
7) आयकर विभागाने जारी केलेले पॅन कार्ड
8) वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (Service Tax)
9) मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र
10) निविदेसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकीत तसेच निवीदाकाराची सही शिक्यासह असणे आवश्यक आहे.
11) काळया यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र
12) निविदेतील सर्व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र

वर नमुद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करावी. तसेच तांत्रिक निविदा लखोटा मध्ये उपरोक्त नमुद केलेल्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती सादर कराव्यात. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर कागदपत्रे सादर न केल्यास निविदा अर्ज निविदा प्रक्रीयेतुन बाद ठरविण्यांत येईल. कागदपत्राच्या पुर्ततेबाबत अटी शिथिल करण्याचे अधिकार निवड समितीस राहील.

सर्व प्रथम तांत्रिक निविदा उघडण्यांत येईल. जर निविदाकार तांत्रिक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यांत येईल व सदर निविदाकाराची निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यांत येणार नाही. पात्र ठरणाऱ्या

निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यांत येईल. आर्थिक निविदे मधील रक्कम तांत्रिक निविदे मध्ये नमुद करण्यांत येवू नये. जर तसे आढळल्यास संबंधित निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यांत येईल.

**ब) आर्थिक निविदा :-**

निविदेचे दरं हे दरपत्रकामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत. आर्थिक निविदेमध्ये निविदाकाराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राहय धरण्यांत येईल.निविदा स्वीकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या समितीला असेल व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निवड समितीस राहील.

कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्थेने संपुर्ण नाव :-
कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्थेचा संपुर्ण पत्ता :-
कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्थेचा संपर्क दुरध्वनी :-
कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्थेचा नोंदणी क्रमांक :-
कंत्राटदार / ठेकेदार / कंपनी / संस्थेचा सेवाकर क्रमांक :-

कार्यालयाचे नाव :- धर्मदाय उप आयुक्त कार्यालय अकोला

| अ.क्र. | संवर्ग गट ड पदाचे नाव | रिक्त पदाची संख्या | कंत्राटदाराने मागणी केलेली रक्कम (प्रती महिना / प्रती व्यक्ती | सेवा कर | एकुण रक्कम रुपये (स्तंभ 4+5) | सर्व करांसहीत 11 महीन्याची एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | शिपाई पदा करिता रिक्त पद संख्या | 5 | | | | |
| 2 | पहारेकरी पदा करिता रिक्त पद संख्या | 01 | | | | |

**वरील तक्त्यांत अं.क्र.4 ते 7 हया स्तंभातील माहीती कंत्राटदाराने भरावयाची आहे. आर्थिक निविदा कंत्राटदाराचे सही / शिक्क्यानिशी असावी.**

**क) पात्र निविदाकाराने / पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाही बाबत :-**

1) उदयोग , उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III / उदयोग-4 दिनांक 01.12.2016 मधील प्रकरण क्र.3/अ.क्र.3.1 व प्रकरण क्र.6 / परिशिष्ट 8 मधील तरतुदी नुसार निविदा / दरपत्रक अर्जासोबत निविदा शुल्क 10,000/- (दहा हजार) चा अकोला ठिकाणी प्रदेश् असणारा राष्ट्रीयकृत बॅंकेचा बॅंक गॅरंटी सहायक धर्मादाय आयुक्त अकोला यांच्या नावे दयावा लागेल.विहित मुदतीत सुरक्षा ठेव अनामत रक्कम (बॅंक गॅरंटी) जमा न केल्यास विहित नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

2) कंत्राटदाराने/ पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापुर्वी रुपये 500/- चे मद्रांक पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

3) करारनामा केल्यांनंतर कंत्राटदाराने विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार विलंब आकार / दंड आकारला जाईल. सदर दंडाची वसुली प्रशासकीय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रकमेतुन करण्यांत येईल.

4) कंत्राटदाराकडुन / पुरवठादाराकडुन करारनाम्यातील कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रदद करण्यांत येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही.ज़मा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल.

5) धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई / धर्मादाय सह आयुक्त, अमरावती / धर्मादाय उप आयुक्त, अकोला यांना कोणत्याही वेळी कारण नदर्शविता निविदाकारास एक महीन्याची आगावू नोटीस देवून करारनामा रदद करण्यांचा / संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल.

**बाहययंत्रणे मार्फत मनुष्यबळ ( शिपाई व पहारेकरी (कंत्राटी)) पुरविणाऱ्या संस्थेसाठी**
**अटी व शर्ती**

1) कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगिक इतर सर्व रोख स्वरुपात अदा न करता संबंधित कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाव्दारेच (Account Payee Cross Cheque ) अदा करावेत.
2) कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची छायांकीत प्रत, सदर धनादेश स्वीकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहिला असुल ,कंत्राटदाराने दरमहा संबंधित कार्यालयास सादर करावे लागतील , जो पर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटरारा चे देयक अदा करण्यांत येणार नाही.
3) कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत 11 महीन्यापेक्षा जास्त राहणार नाही.

4) आवश्यक्ता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

5) सुटटीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडून काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यांत येईल. मात्र अशी बदली रजा देतांना त्या दिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणुनं दुसऱ्या कामगाराची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

6) शिपाई व पहारेकरी (कंत्राटी) वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विना परवानगी गैरहजर राहील्यास त्यांचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यांत येणार नाही. तसेच शिपाई व पहारेकरी (कंत्राटी) रजेवर असल्यास पर्यायी शिपाई व पहारेकरी (कंत्राटी) यांची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

7) ज्या कंपनीस / संस्थेस काम सोविण्यांत येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

8) कंपी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे उत्तर दायीत्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही.

9) सदरील निविदेस शासनाकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळाल्यानंतर ती आमलात येईल.

10) कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा/ सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यांत येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

11) कार्यालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यांत येणाऱ्या सोई सुविधा / काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यांत येणार आहे , त्या अनुषंगाने लागू होणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

12) उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यांत येणार आहे त्यांना नियमित कर्मचाऱ्या प्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय / लागू राहणार नाही. त्यांना सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधना बाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

13) नियुक्ती प्राधिकाऱ्याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरुप बदलल्यास त्याप्रमाणे संस्था/ कंपनी /कंत्राटदार / ठेकेदार यांनी कामे करुन देण्यांचे त्यांच्यावर बंधनकारक राहील त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही.

14) कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरवितांना बाल कामगारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

15) कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करतांना त्यांच्या नजरेस ज्या बाबी येतील , त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्या संबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, या बाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

16) कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगाराकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास , नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्मेतुन वसुन करण्यांत येईल.

17) केवळ निविदा भरली म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

18) कंत्राटदारास कंत्राटाचे संबंधात कोणत्याही प्रकारची आगावू रक्कम दिली जाणार नाही.

19) निविदाधारकास अस्तीत्वात असलेल्या अनुषंगिक सर्व कायद्याचे नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

20) सदरील कर्मचाऱ्यांचा अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्यांची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.कर्मचाऱ्यांकडुन कार्यालयास / इतरांस नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्यांची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

21) व्यसनाधीन , गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या खाजगी कर्मचाऱ्यास नियुक्ती देता येणार नही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पुर्वी अशा कर्मचाऱ्यांची चारित्र पडताळणी प्रमाणपत्र तसेच महाराष्ट्र अधिवासी असल्याचे प्रमाणपत्र घेणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. सदर उमेदवारांचे दोन्ही प्रमाणपत्रे नियुक्ती वेळी कार्यालयास सादर करावेत.

22) करार कालावधित उमेदवाराची सचोटी संशयास्पद आढळून आल्यास अथवा कामकाजामध्ये निष्काळजी पणा दाखविल्यास अथवा करारातील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर करारनामा संपुष्टात येईल व उमेदवारास कोणतीही पूर्व सुचना न देता काढून टाकण्यांत येईल.

23) आयकर अधिनियमा प्रमाणे दरमहा अदा होणाऱ्या देयका मधून नियमानुसार आयकर वजा करण्यांत येईल.यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यांत यावी.

दिनांक :- 13.10.2026

ठिकाण :- अकोला.

Mwoheni
13.10.26

धर्मादाय उप आयुक्त,
अकोला विभाग अकोला.

## काळया यादीत न टाकल्याबाबत / बंदी न घातल्याबाबत प्रमाणपत्र

मी/आम्ही श्री ---------------------------------------- व श्री ----------------------------------------मालक / संचालक (संस्थेचे नाव ) शपथपूर्वक घोषित करतो की उक्त नमुद संस्था ------------ वर्षापासुन मनुष्यबळ पुरवठयाचे काम करत आहे. त्यानुसार मी / आम्ही असे स्वप्रमाणित करतो की , दरपत्रक /निविदा भरण्यांच्या दिनांकास म्हणजेस दिनांक ------------- रोजी मनुष्यबळ पुरविण्यांचे काम समाधानकारक रित्या पार न पाडल्यामुळे कोणत्याही केंद्र शासकीय , राज्य शासकीय अथवा निमशासकिय कार्यालयाने मेसर्स (संस्थेचे नाव) या संस्थेस काळया यादीत टाकण्यांत आलेले नाही अथवा संस्थेकडून मनुष्यबळ पुरवठयाचे काम करुन घेण्यास बंदी घालण्यांत आलेली नाही. तसेच

या संस्थेविरुध्द मनुष्यबळ पुरवठयाच्या कामाच्या अनुषंगाने भारतामधील कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा / खटला प्रलंबित नाही. तसेच आमचे विरुध्द कोणत्याही पोलीस स्थानकात गुन्हा दाखल नाही.

उपरोक्त प्रमाणे करण्यांत आलेले निवेदन हे संुपूर्णपणे सत्य आहे.

स्वाक्षरी